जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 OCT 2017
लोकमत




प्रा. मनीषा जगदीश चव्हाण यांना शिवाजी विद्यापीठातर्फे अर्थशास्त्र विषयाची पीएच.डी. पदवी मिळाली. त्यानिमित्त विद्यापीठ सोसायटीतर्फे त्यांचा महापौर हसिना फरास यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी विकास जोशी, विजयकांत नगरशेठ, के. पी. वायफळकर उपस्थित होते.

# विद्यापीठ महाविद्यालयात मनीषा चव्हाण यांचा सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामार्फत अर्थशास्त्र विषयाची पीएच. डी. पदवी मिळाल्याबद्दल प्रा. मनीषा जगदीश चव्हाण यांचा विद्यापीठ सोसायटी व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने कौतुक सोहळा आयोजित करण्यात आला. महापौर हसिना फरास यांच्या हस्ते त्यांना मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

कोल्हापुरातील विद्यापीठ कनिष्ठ महाविद्यालयात मनीषा चव्हाण या प्राध्यापक असून, त्यांनी पीएच.डी. पदवी मिळवली. त्यांच्या कौतुक सोहळ्याप्रसंगी विद्यापीठ सोसायटीचे अध्यक्ष विकास जोशी व उपाध्यक्ष विजयकांत नगरशेठ हे प्रमुख उपस्थित होते.

यावेळी कॉलेजचे उपप्राचार्य के. पी. वायफळकर यांनी मनोगत व्यक्त केले. आर. वाय. हेगडे यांनी सूत्रसंचालन केले. एन. ए. कांबळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. जी. जी. पैठणे यांनी आभार मानले. याप्रसंगी प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.